“लेखणी सोबत तलवार हाती घ्यायला शिका, कृष्णाला हाक न मारता स्वत: कृष्ण बनायला शिका” - प्र.प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड

दिनांक: 16.12.2019

लातूर : दयानंद कला महाविद्यालयात मुलींचे स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन आज दि. 16.12.2019 रोजी सायं. 04.30 ते 06.30 या वेळामध्ये यशस्वीरित्या संपन्न झाले.

या प्रसंगी प्रस्ताविक मांडताना समन्वयक प्रा.डॉ. सुनीता सांगोले यांनी सांगितले की - आज दैनंदिन जीवनात जगाची माहिती घेण्याच्या दृष्टिकोनातून वृत्तपत्राची सहाय्यता घेतली असता केवळ एक बातमी प्रकर्षाने दिसून येते व मनात दु:खद कळ दाटून येते ती म्हणजे सततच स्त्री होणारा अन्याय, अत्याचार, बलात्काराच्या घटना आदि. समाजातील अनेक घटकांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपभोग्य वस्तु म्हणून पाहिले जाते. त्यामुळे 3 वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्ध स्त्रीयासुद्धा विदारक विचारप्रवृत्तीच्या लोकांपासून सुटलेल्या दिसून येत नाहीत. विशेषत: शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थीनी असो की घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीया असो त्यांना नकळत एक गंभीर संकटाचे सावट ‘आ’ वासून त्यांच्यासमोर उभे राहते. मग ऐनवेळी मदतीलाच कोणी धावून येईल असे दिसून येत नाही व अशा भीषण घटना घडतात. तिच चारित्र्य हनन तर होतच पण तिचे प्राणही घेतले जातात. अशा परिस्थितीत मुलींनी स्वसंरक्षणाची जबाबदारी स्वत:च उचलली पाहिजे. या दृष्टीने मुलींना आत्मर्भर बनविण्यासाठी याप्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्र.प्राचार्य शिवाजी गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की - मुलींची बौद्धिक जडणघडण तर महत्वाची आहेच पण त्याचबरोबर त्यांची सुरक्षितता अधिक मोलाची आहे. सरस्वती पूजन करून मुलींनी गुणवंत बनल पाहिजे आणि वेळेप्रसंगी स्वसंरक्षणासाठी दूर्गा-चंडीका बनून लढता आल पाहिजे. लेखणी सोबत तलवार हाती घ्यायला शिका. कृष्णाला हाक न मारता स्वत: कृष्ण बनायला शिका. या दृष्टिने आजच्या काळातील स्वयं सुरक्षिततेची साधने ज्यात पेपर स्प्रे, क्युबटॉन, पीन, चाकू, लाटने, मॅग्झीन... अशा प्रकारची आपल्या जवळची साधने वापरून प्रसंगी आपण

आपली संकटातून सुटका कशी करून घेऊ शकतो याबद्दल वेगवेगळी उदाहरणे दिली.

प्रस्तुत कार्यक्रमात यशोदीप बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ. मीना भोसले यांनी मुलींनी आपण कुठे जातो, काय करतो याबाबतची संपूर्ण माहिती आपल्या कुटुंबियांशी व जवळच्या लोकांना सांगितली पाहिजे तसेच याचे लोकेशन सातत्याने शेयर केले पाहिजे. त्यामुळे एखादे संकट आले तर आपल्याला मदतीचा हात मिळू शकतो. आपण सुरक्षित राहू शकतो असे मत प्रतिपादन केले. अशिहारा कराटे असोसिएशन चे अध्यक्ष श्री. के. वाय. पटवेकर यांनी मुलींकडून स्वसंरक्षणाकरीता कराटेचे काही धडे प्रात्यक्षिकासह करून घेतले. पाठीमागून हल्ला झाला तर काय करावे? बाजूनी कोणी अंगावर चालून आले तर? संकट समयी क्षण ना क्षण सतर्क राहून आपण 5 मिनिट का होईना आपल्यावर चाल करून येणाऱ्याला चित केल पाहिजे. यासाठी लागणाऱ्या तंत्रांचे प्रात्यक्षिक करून घेतले. इथून पुढील 21 तारखेपर्यंतच्या कार्यक्रमात अशा अनेक प्रात्यक्षिकांचा समावेश आहे असे सांगत आजच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी उपप्राचार्य (क.म.) प्रा.अनिलकुमार माळी, प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे, श्रीमती शोभा कोंडेकर, कु. प्राजक्ता भोसले तसेच याशिबीरास बहुसंख्य विद्यार्थीनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उजैस्वी शैलीत सौ. शैलजा दामरे (हसबे) यांनी केले.